**प्रास्ताविक,**

आकांक्षा एज्युकेशन फाऊंडेशन ही संस्था सन २०१६ मध्ये स्थापन करण्यात आलेली आहे. या संस्थेअंतर्गत आकांक्षा स्पेशल चाईल्ड स्कूल चालविली जाते. शिरुर शहरातील व परिसरातील मतिमंद व विकलांग त्याचबरोबर सेरेब्रल पाल्सी, ऑटीझम, डाऊन सिंड्रोम अशा विशेष मुलांसाठी ही संस्था काम करत आहे. त्याचबरोबर समाजातील अशा शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या पालकांना मुख्य प्रवाहात आणून जगण्यासाठी नवी दिशा देणे हे संस्थेचे उद्दीष्ट आहे.

आकांक्षा या संस्थेच्या नावाची स्थापना संस्थेच्या प्रमुख संस्थापिका - राणीताई चोरे यांची मोठी कन्या आकांक्षा हिच्या नावापासून झाली. राणीताई चोरे यांच्या दोन्ही कन्या आकांक्षा व समीक्षा या दोघींना (MPS) हया सिंड्रोमचा जेनेटीक आजार असून वयाच्या सहाव्या वर्षापासून या आजाराची लक्षणे समोर आली. सहाव्या वर्षापर्यंत बोलू शकणाऱ्या दोन्ही मुली अचानक बोलण्याच्या पुर्णपणे बंद झाल्या. स्वत:च्या कोणत्याही दैनंदिन गरजा पुर्णपणे करु शकत नाहीत. अशा वेळी त्यांना ट्रेनिंग देण्यासाठी त्यांच्यात विकास होण्यासाठी वेगवेगळया हॉस्पिटल, स्पेशालिस्ट यांना दाखविले, खूप विशेष मुलांच्या शाळेमध्ये त्यांना ॲडमिशनसाठी प्रयत्न केले. परंतु अपंगत्त्वाची तीव्रता खूप असल्यामुळे त्यांना ॲडमिशन मिळत नव्हते. प्रवासात जाता-येताना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे. प्रवासात विशेष मुली असल्याने ओरडल्याने, रडल्याने एस.टी. मधून खाली उतरावे लागे. मुल स्पेशल असणं म्हणजे जणू त्यात त्या बाळाच्या आईचाचं दोष आहे, असे समजले जाते. समाजात या विशेष मुलांमुळे खूपदा तिरस्काराची वागणूक मिळे. तुम्ही इतरांपेक्षा वेगळे आहे, तुम्ही दुसरीकडे बसा अशा प्रकारचा त्रास झाला. विविध कठीण प्रसंगाना सामोरे जावे लागे. अशा प्रकारच्या त्रासातून सामोरे जात असताना ज्या काही विशेष संस्थांमध्ये त्यांना प्रवेश मिळाला तेथेही त्रासदायक अनुभव आले आहेत. आपल्या बाळाच्या टॉयलेट साफ करण्यापासून ते

त्यांचे पुर्ण संगोपन करण्याची संपूर्ण जबाबदारी त्या विशेष मुलांच्या आईचीच असते. या भावनेतून घर, नातेवाईक, समाज या प्रत्येक घटकाकडून नेहमी परकेपणाची वागणूक मिळे.

आजही प्रगतशिल असलेल्या भारत देशात स्त्री-पुरुष असा भेदभाव आहे. त्यात विशेष मुले असलेल्या कुटुंबात विशेष मुलांच्या मातांना खालच्या दर्जाची वागणूक मिळते. अशा अनेक समस्यांना जवळून अनुभवल्यानंतर अशा विशेष मुलांना व त्यांच्या पालकांना स्वाभिमानाने जगता यावे, सन्मानाने वागणूक मिळावी म्हणून अशी संस्था आपण सुरु केली तर? अशा या प्रेरणेतून सन २०१६ मध्ये आकांक्षा एज्युकेशनल फाऊंडेशन या संस्थेची स्थापना करण्यात आली. समाजाने व कुटुंबाने स्विकार करावा व त्यांना दैनंदिन जीवनातील अडचणी व गरजा पूर्ण करता याव्यात, या जाणिवेतून 'नाते शब्दांपलिकडचे' या संस्थेच्या ब्रीद वाक्याप्रमाणे विशेष मुलांचा सांभाळ व संगोपन केले जाते. आज रोजी आकांक्षा मध्ये सुमारे ३० विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांना स्वावलंबनाचे शिक्षण दिले जाते.

**संस्थेचे उद्दीष्ट :**

समाजातील अपंग, विशेषत: विकलांग मुलांना सक्षम करुन त्यांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हाच प्रमुख संस्थेचा उद्देश आहे. अशा विद्यार्थ्यांच्या प्रकारानुसार संस्थेत प्रवेश दिला जातो. त्याचप्रमाणे या मुलांना किमान दैनंदिन जीवन व्यवस्थित जगता यावे यासाठी मुलभूत शिक्षण दिले जाते.

**विशेष मुलांविषयी थोडक्यात माहिती :**

विशेष गरजा असणाऱ्या व सर्वसामान्यांपेक्षा बौध्दीक व शारीरिक क्षमता कमी असणाऱ्या मुलांना विशेष (मतीमंद) बालक असे म्हटले जाते. अशा विशेष मतीमंद मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांच्या दैनंदिन जीवनातील किमान गरजा ओळखून त्यांना स्वावलंबी बनवणे ही महत्त्वाची गरज असते, त्यानुसार अशा मुलांची बौध्दीक क्षमता

ओळखून त्यांना संस्थेत प्रवेश दिला जातो. संस्थेत बालकांना प्रवेश दिल्यानंतर अशा विद्यार्थ्यांचा सुरुवातीला अभ्यास करुन त्यानुसार केस फाईल केली जाते. या मुलांना अपंगत्त्व येण्याची कारणे जरी वेगवेगळी असली तरी त्यांनुसार अपंगत्त्व ओळखून सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने संस्थेतर्फे विशेष प्रयत्न केले जातात. तसेच मुलांची मानसिकता, वर्तणूक, प्राथमिक गरजा, आदी समस्या जाणून घेऊन अशा विद्यार्थ्यांबरोबर काम केले जाते. डे केअर सेंटरमध्ये विशेष मुलांची काळजी घेतली जाते. दैनंदिन कौशल्याबरोबरच मुलांना शैक्षणिक, सामाजिक, व्यावसायिक कौशल्य शिकवले जाते. वयोगट ३ ते १८ या मुलांना प्रायमरी बेसवर शिकवले जाते, तर १८ वर्षापुढील मुलांना व्यावसायिक ट्रेनिंग दिले जाते. अतितीव्र मतीमंदत्त्व व मतीमंदत्त्व असणाऱ्या मुलांसाठी केअर ग्रुप केला आहे, त्यानुसार टॉयलेट ट्रेनिंग, जेवण, कपडे घालणे ही सर्व कामे काळजीवाहू मावशी व विशेष शिक्षक करतात. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष गोष्टींमधून मुलांना शिक्षण दिले जाते.

**संस्थेतर्फे राबविले जाणारे उपक्रम :**

प्रत्येक बालकाला प्रवेश दिल्यानंतर विशेष बालकांसाठी विविध उपक्रम राबविले जातात ते पुढीलप्रमाणे :

१) शैक्षणिक उपक्रम : विशेष मुलांना सर्वप्रथम दैनंदिन कौशल्य शिकविले जाते. यामध्ये टॉयलेट ट्रेनिंग, सामान्यज्ञान, अंकगणित, अक्षर ओळख, रंगाची ओळख, पझल्स्, कार्डशीट, चित्रीफिती यामधून मुलांना बेसिक ट्रेनिंग दिले जाते.

२) सामाजिक उपक्रम : संस्थेमध्ये दहिहंडी, रक्षाबंधन, गणेशोत्सव, दिवाळी अशा प्रकारचे वेगवेगळे सण साजरे केले जातात. यामध्ये पालकांना प्राधान्याने सहभाग वाढविला जातो.

३) विशेष मुलांबाबत समाजात जनजागृती वाढविण्यासाठी वेळोवेळी तज्ञांचे मार्गदर्शन, व्याख्यान, आरोग्य शिबीर आदि मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित केले जातात.

४) विशेष मुलांना समाज व त्याच्या आजूबाजूचा परिसर ओळख होण्यासाठी निसर्गभेट वेगवेगळया धार्मिक स्थळांना निसर्ग ठिकाणी प्राणी संग्रहालय, मॉल, सरकारी कार्यालय आदि ठिकाणी भेटी, गाठी व सहलींचे आयोजन करण्यात येते. मुलांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी वार्षिक स्नेह संमेलने आयोजित केले जातात.

५) व्यवहारिक कौशल्य : यामध्ये विशेष मुलांमधील गुण ओळखून स्वावलंबी बनविणे यासाठी मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. आकाश कंदिल बनविणे, कागदी पिशवी, पणत्या रंगविणे अशा प्रकारचे किमान शिक्षण यामध्ये दिले जाते.

**<u>इतर उपक्रम :</u>**

१) विशेष मुलांचे अपंगत्व ओळखून त्यानुसार मानसोपचार तज्ञ, तसेच थेरपीस्ट यांच्या माध्यमातून तपासण्या करुन सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो. खेळ, प्राणायाम, योगा, मेडिटेशन मधून स्मरणशक्ती वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

२) पालकांच्या मनातील न्यूनगंड दूर करुन पालकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले जातात.

३) विशेष मुलांच्या गरजा ओळखून त्यानुसार अध्यापन साहित्य व शालेय साहित्य पुरविले जाते.

४) विद्यार्थ्यांमध्ये स्थिरता येण्यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले जातात. अशाप्रकारे इतर विविध उपक्रम संस्थेत वेळोवेळी राबविले जातात.

भविष्यात राबविले जाणारे उपक्रम : सध्या प्राथमिक पातळीवर संस्था स्वखर्चाने चालविली जात असून शासकीय मदत अदयाप कोणतीही मिळत नाही. समाजाकडून

या उपक्रमाचे मोठया प्रमाणावर स्वागत होत असून भविष्यात संस्थेकडून पुढील उपक्रम राबविले जाणार आहेत.

१) विशेष मुलांमध्ये प्रामुख्याने विशेष मुलींसाठी खूप कमी प्रमाणात वसतिगृह असल्याचे दिसून येते. त्यामुळे आकांक्षा या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट हे विशेष मुलींसाठी वसतिगृह सुरु करणे हे आहे.

२) संस्थेचे कामकाज व उपक्रम वाढविण्याच्या हेतूने संस्थेची इमारत उभी करणे.

३) विशेष वयोगटातील व्यक्तींसाठी पुनर्वसन केंद्र चालू करणे.

४) वयोवृध्दांसाठी वृध्दाश्रम सुरु करणे, आदि उपक्रम आकांक्षा संस्थेकडून राबविण्याचा संस्थेचा मानस आहे.

**संस्थेचा पत्ता :**

**आकांक्षा एज्युकेशनल फाऊंडेशन**

ओमरुद्रा मार्केट, एच.पी. पेट्रोल पंपाजवळ, रामलिंग रोड, शिरुर, घोडनदी,

ता. शिरुर, जि. पुणे. पिन-४१२२१०

मो. ८६०५१८२१०० / ९८९०२३१७४१

E-mail : akankshaspleducation@gmail.com